# प्रकरण - २

# प्रकरण २

# कोल्हापूर जिल्हा : एक दृष्टिक्षेप

या प्रकरणात कोल्हापूर जिल्हयातील भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कारण कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना एकंदरीत परिसर आणि वस्तुस्थितीची जाणीव असणे आवश्यक असते. त्यामुळेच सर्वसाधारणपणे कोल्हापूर जिल्हयाचे स्वरूप वाचकांच्या लक्षात येते. याशिवाय या प्रकरणात मागासवर्गीयांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासन राबवित असलेल्या विकास योजना किंवा कार्यक्रमांची संक्षिप्त माहिती पुरवलेली आहे.[१]

कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडील नैऋत्य पठारी भागावर येतो सन २००१ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्हयात १२ तालुके आहेत. मुलकी गावांची संख्या १२१७ तर शहरांची संख्या १० इतकी आहे. सन २०००-०१ च्या जनगणनेपासून ते २००४-०५ पर्यतच्या कोल्हापूर जिल्हयाच्या लोकसंख्येची आकडेवारी ही तक्ता क्रमांक २.१ च्या आधारे दर्शविली आहे. लोकसंख्येनुसार कोल्हापूर जिल्हयाचा महाराष्ट्र राज्यात लोकसंख्येच्या बाबतीत आठवा क्रमांक लागतो.[२]

**तक्ता क्रमांक २.१**

**कोल्हापूर जिल्हयातील अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या**

| वर्ष | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|
| २०००-०१ | ३५,१५,१६२ | ४,६१,०७७ | १८,३७२ |
| पुरुष | १८,०४,०६८ | २,३२,०३२ | ९,४५१ |
| स्त्रिया | १७,११,०९४ | २,२९,०४५ | ८,९२१ |
| २००४-०५ | ३७,०३,९१५ | ४,८४,८७२ | २०,३७२ |
| पुरुष | १९,२१,०२१ | २,६८,६६० | १०,४१२ |
| स्त्रिया | १७,८२,८९४ | २,१५,८१२ | ९,९६० |

संदर्भ : महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा, २०००-०१

तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, कोल्हापूर जिल्हयात अनुसूचित जमातीच्या तुलनेने अनुसूचित जातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे.

### भौगोलिक पार्श्वभूमी

कोल्हापूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ७७४६ चौ. मी. आहे. सदर क्षेत्रफळ राज्याच्या क्षेत्रफळाच्या २.५ टक्के असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने कोल्हापूर जिल्हयाचा राज्यात २४ वा क्रमांक लागतो. हा जिल्हा १५° पूर्व ते १७° उत्तर अक्षांश आणि ७३° ते ७४° पूर्व रेखांशावर वसला असून जिल्हयाच्या पश्चिमेकडील भाग डोंगराळ, जमीन ही तांबड्या मातीची असून सह्याद्रीच्या कडा आहेत. उत्तरेस वारणा नदी, पूर्वेस नद्यांच्या खो-यांचा प्रदेश अंशत: कृष्णा, पंचगंगा नदी असून तेथील जमीन ही काळ्या मातीची आहे. दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हा अशा चतु:सिमा आहेत. जिल्हयातून कृष्णा, वारणा, पंचगंगा, दूधगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी आणि घटप्रभा या नद्या वाहतात.

कोल्हापूर जिल्हयातील लोकांच्या प्रशासकीय सोयी सुविधांच्या दृष्टीने जिल्हयात १२ पंचायत समित्या, १ महानगरपालिका, ९ नगरपरिषदा, १०३० ग्रामपंचायती तर २७ पोलीस ठाणी आणि १९ पोलीस औट पोस्ट ऑफिस कार्यरत आहेत.[3]

### ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्राचीन काळी कोल्हापूरास करवीर क्षेत्र असे म्हणत असत. पद्मपुराणाचा भाग मानलेल्या करवीर महात्म्य मध्ये करवीर क्षेत्राला दक्षिण काशीचे महत्त्व दिलेले आहे. ऐतिहासिक परंपरेची साक्ष देणारी अनेक स्मारके आणि शिल्पे कोल्हापूरात आढळून येतात. यामधील महत्त्वाचे म्हणजे महालक्ष्मी मंदिर, टाऊन हॉल, शालिनी पॅलेस, रंकाळा ही होय.

कोल्हापूर जिल्हयाला छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या मावळ्यांच्या शौर्याची व पराक्रमाची परंपरा लाभलेली आहे. त्याची साक्ष जिल्हयातील घोडखिंड, पावनखिंड देत आहेत. कोल्हापूर जिल्हयातील जनमानसावर शिवकालापासूनच राष्ट्रीय विचारांचा प्रभाव पडलेला आहे. आणि त्याच्यांच विचारांचा, परंपरांचा आणि वंशजांचा वारसा व

पुरोगामी विचारांचे व्यक्तिमत्व कोल्हापूर जिल्हयाला राजर्षी छ. शाहू महाराजांच्या नेतृत्त्वाने लाभले.[४]

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज : कोल्हापूर जिल्हयातील विकासात्मक भूमिका व परिणाम**

कोल्हापूर जिल्हा हा पूर्वी राजर्षी छ. शाहू महाराजांचे संस्थान होते. कोल्हापूर संस्थानच्या प्रशासनात केवळ उच्चवर्गीय समाजातील लोकांचा अधिकारी म्हणून समावेश होता. सर्वसामान्य बहुजन समाजातील व्यक्तींचा अभाव होता. म्हणूनच सर्वप्रथम राजर्षी छ. शाहू महाराजांनी संस्थानातील बहुजन समाजाच्या उध्दाराला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे जाणून अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षणाचे दरवाजे खुले केले. २५ जुलै १९१७ च्या हुकुमानुसार महाराजांनी प्राथमिक शाळेत फी माफीची घोषणा केली तर २१ नोव्हेंबर १९१७ रोजी काढलेल्या जाहीरनाम्यानुसार कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. अस्पृश्यांच्या मुलांना शहरी शाळामध्ये शिक्षण घेता यावे म्हणून शाहू महाराजांनी अस्पृश्य मुलांसाठी "मिस क्लार्क वसतिगृह" सन १९०८ मध्ये स्थापन केले. शिवाय छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूरात निरनिराळ्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अशी वसतीगृहे सुरू केली. यामध्ये सन १९०१ मध्ये "व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग" तर १९६० मध्ये "वीरशैव लिंगायत बोर्डिंग" सुरू केले. अस्पृश्य मुलांना केवळ शिक्षणाचे दरवाजे खुले करून ते थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या संस्थानात माहूत, कोच मन, घोडेस्वार, मोटारीचे ड्रायव्हर, क्लीनर, पोलीस, पुजारी यासारख्या कामात अस्पृश्यांना तरबेज बनवून त्यांना आपल्या पदरी नोक-या देवून त्यांच्या उदरनिर्वाहाच्या प्रश्नाची सोडवणूक केली. आणि संस्थानातील ५० टक्के जागा ह्या बहुजन समाजातील मुलांसाठी राखीव ठेवल्या.[५]

राजर्षी छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाला आर्थिक बाबतीतही प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न केला. यामध्ये पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीला पाणी पुरवठा निश्चित स्वरूपात आणि मुबलक प्रमाणात व्हावा यासाठी कोल्हापूरच्या पश्चिमेला सुमारे ५५ किलोमीटर अंतरावर भोगावती नदीला बंधारा घालून "महाराणी लक्ष्मीबाई तलाव" निर्माण केला. सन १९०९ ला सुरू केलेले राधानगरी धरणाचे बांधकाम १९१८ साली पूर्ण केले. शिवाय संस्थानातील शेतीतून नवीन पिके काढण्याचे ज्ञान महाराजांनी आत्मसात करून संस्थानात चहा, कॉफी आणि मसाल्याच्या

पदार्थांची यशस्वीपणे लागवड केली. शेतीबरोबरच व्यापार व उद्योगधंद्याच्या विकासाकडे लक्ष पुरविले. कोल्हापूरच्या गुळाला असलेली मागणी तसेच व्यापार वृध्दीसाठी रेल्वे स्टेशन उभारले. सन १८९५ मध्ये रेल्वे स्टेशनजवळ "शाहुपूरी" या व्यापारपेठेची स्थापना केली. शिवाय सन १९०६ मध्ये महाराजांनी "श्री शाहू छत्रपती स्पिनिंग मिल्स" चा पाया घातला. तर सन १९०७ मध्ये सहकारी तत्त्वांनी चालणा-या एका कापड गिरणीची उभारणी केली. याशिवाय जिनिंग फॅक्टरी व हातमाग फॅक्टरी यांनाही राजर्षी छ. शाहू महाराजांनी आर्थिक सहाय्य केले आणि सहकाराची मुहूर्तमेढ रोवली.

एकंदरीतच उदारमतवादी पुरोगामी अशा विचारांची भूमिका राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या रूपाने कोल्हापूर संस्थानाला लाभल्याने त्यांच्याच विचारांची कास अनेकांनी धरली. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी संस्थानात रयत शिक्षण संस्थेचे जाळे पसरविण्याचे व स्वावलंबी शिक्षणाचे धडे देऊन शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळातील लोकांपर्यंत नेऊन पोहोचविण्याचे काम केले.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातसुध्दा कोल्हापूरची जनता सहभागी झाली होती. भाई माधवराव बागल हे जातीभेद निवारक व सत्यशोधक चळवळीचे प्रमुख नेते, रत्नाप्पा कुंभार, शंकरराव देव आणि केशवराव जेधे इ. मंडळीनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला होता.[६]

**स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय स्थिती**

कोल्हापूर जिल्हयाची राजकीय स्थिती पाहता कोल्हापूर जिल्हयाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मुख्यत: कोल्हापूर व इंचलकरंजी असे २ लोकसभा मतदार संघ आहेत. तर कोल्हापूर शहर, करवीर, सांगरुळ, गडहिंग्लज, चंदगड, कागल, राधानगरी, भुदरगड, पन्हाळा-बावडा, शिरोळ, शाहुवाडी, इंचलकरंजी व वडगाव असे १२ विधानसभा मतदार संघ असून त्यापैकी वडगाव हा मतदार संघ जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीसाठीचा खास राखीव मतदार संघ आहे.

कोल्हापूर जिल्हयात ९ नगरपालिका असून इंचलकरंजी या मोठ्या शहरासाठी "अ" वर्ग नगरपालिका आहे. तर उरलेल्या ८ नगरपालिका ह्या "क" वर्गात येत असून त्या पन्हाळा, वडगाव, जयसिंगपूर, कुरुंदवाड, कागल, मुरगुड, गडहिंग्लज व मलकापूर ह्या आहेत.[७]

## विकासाची संकल्पना

"समाजातील अधिकाधिक लोकांच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे आणि त्यांच्या जीवनमानाच्या दर्जात सुधारणा घडवून आणणे म्हणजे विकास होय.' विकासाची संकल्पना ही स्थल काल परिस्थिती सापेक्ष असते म्हणूनच त्या अनुषंगाने कारकिर्दीचे मूल्यमापन करणे इष्ट ठरते. विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण व शहरी जीवनातील मूलभूत सोयी सुविधांची उपलब्धता आणि दीर्घकालीन योजना यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण व शहरी विकासात शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी, रस्ते, उद्योग, व्यवसाय, शिक्षण, वीज, वाहतूक, आरोग्यविषयक सुविधा इत्यादी कामाचा अंतर्भाव होतो.[८]

## स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक परिस्थिती

सन १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चिमात्य देशातील भांडवलशाही व सोविएत रशियातील साम्यवाद या दोन परस्पर विरोधी विचारप्रणालीचा पाठपुरावा न करता भारताने लोकशाही समाजवाद, मिश्र अर्थव्यवस्था व नियोजन हा मार्ग स्वीकारला.

सन १९८५ मध्ये लागवडी योग्य क्षेत्राची टक्केवारी ५३.१८ टक्के इतकी होती. जिल्हयातील राधानगरी व तुळशी जलप्रकल्पाने जिल्हयातील जवळवळ ४८,२४८ हेक्टर इतके क्षेत्र लागवडी (ओलिताखाली) खाली आणले आहे. याशिवाय जिल्हयातील नद्यांवर कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे घालून उपसा जलसिंचनाद्वारे जिल्हयातील अधिकाधिक क्षेत्र लागवडीखाली आणले आहे. त्याचाच परिणाम म्हणून जिल्हयातील लागवडीयोग्य क्षेत्राची टक्केवारी उत्तरोत्तर वाढत आहे.

जिल्हयातील शासनाने शेती विकासासाठी विविध योजना अंमलात आणल्या. त्याचा परिणाम म्हणून जिल्हयातील शेती उत्पादनात उत्तरोत्तर वाढ घडून येत आहे.

जिल्हयातील कृषी उत्पादित मालाची साठवण व पणन यासाठी जिल्हयातील चार नियंत्रित बाजार समित्या कोल्हापूर, गडहिंग्लज, वडगांव आणि जयसिंगपूर या ठिकाणी आहेत.

दूध आणि दुग्ध व्यवसायामध्येही जिल्हयाने आघाडी घेतली आहे. जिल्हयात कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, श्री वारणा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ आणि शिरोळ तालुका सहकारी दूध उत्पादक संघ असे तीन प्रमुख सहकारी दूध उत्पादक संघ आहेत. तर जिल्हयात ३१७६ सहकारी दूध संस्था कार्यरत आहेत. शिवाय जिल्हयात सहा ठिकाणी शीतगृहाची सोय केलेली आहे. यामुळेच जिल्हयाला दूध व दुग्ध व्यवसायापासूनही अधिक प्रमाणात लाभ होत आहे.[९]

कातडे कमाविणे, पादत्राणे बनविणे, दोर वळणे, विटा व कौले तयार करणे, बांबू व वेताच्या वस्तू तयार करणे, विड्या वळणे, लोहारकाम, सुतारकाम करणे, तपकीर तयार करणे, मद्य तयार करणे, कुक्कुटपालन, हातमाग, पोहे व चिरमुरे तयार करणे असे अनेक कुटीर उद्योग जिल्हयात केले जातात. या उद्योगासाठी शासनही सहाय्य करते आहे. जिल्हयात इंचलकरंजी येथे हातमाग व यंत्रमाग हा कुटीर उद्योग मोठ्या प्रमाणात केला जातो.

जिल्हयात उद्योगधंद्यांना आवश्यक असलेली संरचना, सुपीक जमीन, मुबलक पाणी व वनउत्पादनाचा मुबलक पुरवठा तसेच वाहतुकीच्या व दळणवळणाच्या सोयी सुविधा ह्या उपलब्ध आहेत. याशिवाय वित्त पुरवठा करणा-या सहकारी व राष्ट्रीयकृत बँका आणि इतर वित्त संस्था यामुळे उद्योगधंद्यांस आवश्यक असणारा भांडवल पुरवठा उपलब्ध होतो. कोल्हापूरी चप्पल, कोल्हापुरी साज हे जिल्हयातील सुप्रसिध्द उद्योग असून जिल्हयाच्या परिसरात हे उद्योग मोठ्या प्रमाणात चालत आहेत. शिवाय जिल्हयातील उद्योगधंद्याच्या विकासामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (M.I.D.C.) च्या औद्योगिक वसाहती कोल्हापूर, शिरोली, गोकुळशिरगांव, हलकर्णी आणि गडहिंग्लज येथे निर्माण केलेल्या आहेत. जिल्हयातील गुळाला देशात खूप मागणी आहे. यामुळेच कोल्हापूर ही गुळासाठी सुप्रसिध्द बाजारपेठ मानली जाते. जिल्हयात

प्रामुख्याने १८ सहकारी साखर कारखाने आहेत. या व्यतिरिक्त जिल्हयात स्पिरिट, मद्यार्क निर्मिती, खाद्यतेल, अधातू खनिज पदार्थ निर्मिती, औषध व रसायन उद्योग, कागद व त्यापासून वस्तू बनविण्याचे कारखाने, सिमेंटचे पाईप, ॲल्युमिनियमची भांडी बनविणे, गाड्यांचे सुटे भाग बनविणे इ. उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात केले जातात. याशिवाय जिल्हयातील सिनेमा व्यवसायही तेजीत चाललेला व्यवसाय आहे.

ऑईल इंजिन, लेथ मशीन, ड्रिलिंग मशीन, बोअरिंग मशीन, विद्युत मोटार, इलेक्ट्रिक स्टार्टर, स्टील फॅब्रिकेशन, शेतीची सुधारित अवजारे, स्टील फर्निचर, पाण्याच्या व कच-याच्या गाड्या रोलींग शटर, पाऊंडींग मशीन, तांब्याची व अल्युमिनियमची तार, लोखंडी काटेरी तार, स्कूटर, छोटे ट्रॅक्टर, मशीनचे सुटे भाग, बॅलन्सिंग मशीन इ. वस्तूचे उत्पादन जिल्हयात मोठ्या प्रमाणात होत असून ऑईल इंजिनची निर्यात फिलीपाईन्स, इराण, सिरिया, इजिप्त या देशामध्ये होते. तर ऊसाचे चरक हे आफ्रिकेतील घाना या देशात निर्यात केले जातात. तसेच जिल्हयातील कुटीर उद्योग निर्मित वस्तूंना परदेशी बाजारपेठेत मागणी आहे.[१०]

**स्वातंत्र्यपूर्व काळातील समाज रचना**

कोल्हापूर संस्थानात मराठा, जैन,लिंगायत समाजातील लोक मोठ्या प्रमाणात आढळतात. तर धनगर समाजातील लोक डोंगराळ भागात आढळतात. संस्थानात जात-पात, स्पृश्य-अस्पृश्य अशी भेदभावाची वागणूक दिली जात असून अस्पृश्याच्या पदरी केवळ उच्चवर्णियांच्या सेवेची मिरासदारी होती. त्यांना समाजात कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते. बापाचा व्यवसाय मुलाने शिकून पुढे चालविणे हाच शिक्षणाचा प्रकार समाजात रूढ होता.

संस्थानात छत्रपती शाहू महाराजांनी सर्वप्रथम अस्पृश्य उध्दाराचे कार्य केले. समाजव्यवस्थेचे परिवर्तन केवळ शिक्षणच घडवून आणू शकते या उद्देशाने त्यांनी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि व्यावसायिक शिक्षण संस्था निर्माण करण्यावर भर दिला. शिवाय आर्थिक सुधारणाच्या दृष्टीनेही त्यांनी संस्थानात अनेक प्रयत्न केले. एकूणच स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्याचे

आणि समाजाचा सामाजिक व नैतिक दर्जा उंचाविण्याचे श्रेय राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनाच द्यावे लागेल.

प्रामुख्याने महात्मा फुले यांच्या विचारांनी व ध्येयांनी प्रभावित होऊन तो वारसा पुढे चालविण्याचे काम राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केले. यामध्ये खाली नोंदविलेल्या महत्त्वाच्या संस्था तक्ता क्रमांक २.२ मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता क्रमांक २.२**

**संस्थान काळातील महत्त्वाच्या संस्था व त्यांची कार्य/कामे**

| स्थापना - वर्ष | समाज (संस्था) | कार्य/कामे |
|---|---|---|
| ११ जानेवारी १९१९ | सत्यशोधक समाज | धार्मिक बाबतीत उच्चवर्णियांची मक्तेदारी नष्ट करण्याचे, अस्पृश्यता निवारण करण्याचे कार्य केले |
| जुलै १९१३ | सत्यशोधक समाज शाळा | धार्मिक शिक्षण देण्याचे कार्य. या शाळेत शिक्षण घेतलेल्या पुरोहितांनी संस्थानात ५१६३ धार्मिक विधी, १५१३ धार्मिक समारंभ, २२६ विवाह विधी केले. |
| १९१८ | आर्य समाज | स्पृश्य-अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करण्याचे, अनाथ मुलांचे पालनपोषण, मोफत शिक्षण प्रसार, अंधश्रध्दा व जातीभेद उच्चाटन इ. |

संदर्भ : राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे राजकीय विचार, प्रा. केशव हरेल

वरील प्रकारच्या समाजाच्या शाखा कोल्हापूर संस्थानात स्थापन करून व्यक्तींना त्याचा हक्क उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानेच या समाजाचे कार्य राजर्षी छ. शाहू महाराजांनी संस्थानात चालविले होते.[११]

शिवाय राजर्षी छ. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील अस्पृश्यांना मंदिर प्रवेश, सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, कार्यालये, तळी इ. सार्वजनिक ठिकाणीचा प्रवेश त्यांना खुला केला. ज्ञानाशिवाय उपेक्षित असलेल्या अस्पृश्यांसाठी ज्ञानाचे दरवाजे खुले केले. शिवाय अनेक शाळा, शैक्षणिक संस्था निर्माण करण्यावर भर दिला होता. त्यापैकी काही महत्त्वाच्या संस्था तक्ता क्रमांक २.३ मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता क्रमांक २.३**

**काही महत्त्वाच्या शैक्षणिक संस्था**

| वर्ष | शिक्षण संस्था | उद्देश |
|---|---|---|
| १९०३ | टेक्निकल स्कूल | उद्योगधंद्याचे शिक्षण देणे |
| १९११ | गावकामगार पाटील स्कूल | सरकारी कामाचे ज्ञान देणे |
| १९१७ | तपोवन आश्रम व विद्यापीठ | चरित्रसंपन्न नागरिक बनविणे |
| १९१७ | छत्रपती संस्कृत विद्यालय | संस्कृत नागरिक बनविणे |
| १९१९ | तलाठी स्कूल | गावचावडीतील कामाचे ज्ञान देणे |
| १९१९ | श्री. शिवाजी क्षत्रिय वैदीक विद्यालय | वैदीक शिक्षण देणे |

संदर्भ : महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा इतिहास, एल. जी. भिडे व एन. डी. पाटील, १९८५

वरील प्रकारच्या शिक्षण संस्थातून व्यावसायिक शिक्षण देण्याचाही प्रयत्न त्यांनी केला. संस्थानातील प्रत्येक गावात एक शाळा काढलीच पाहिजे असा आदेश काढला. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिवाय स्पृश्य-अस्पृश्यांना एकाच शाळेत प्रवेश दिला जावा असे बंधन लादले. अस्पृश्य समाजाला शिक्षण दिले तर त्यांना आपल्या न्याय हक्काची जाणीव होईल. तसेच प्रत्येकाला शिक्षण घेता आले पाहिजे. शिक्षणाशिवाय एकही विद्यार्थी वंचित राहू नये. विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी शहरात त्यांनी अनेक वसतिगृहे स्थापन केली व त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची मोफत सोय केली. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्याही दिल्या जावू लागल्या.[१२]

राजर्षी छ. शाहू महाराजांनी प्रत्येक जातीची बोर्डिंग काढण्यास १९०१ सालापासून सुरुवात केली. यापैकी पहिले बोर्डिंग म्हणून व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (१९०१), दिंगबर जैन बोर्डिंग (१९०१), वीरशैव लिंगायत विद्यार्थी वसतिगृह (१९०६), मुस्लीम बोर्डिंग (१९०६), मिस क्लार्क होस्टेल (१९०८), दैवज्ञ शिक्षण समाज बोर्डिंग (१९०८), श्री नामदेव बोर्डिंग (१९११), पांचाळ ब्राह्मण वसतिगृह (१९१२), श्रीमती सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण विद्यार्थी वसतिगृह (१९१५), इंडियन ख्रिश्चन होस्टेल

(१९१५), रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग (१९१५), आर्य समाज गुरुकुल (१९१८), वैश बोर्डिंग (१९१८), ढोर-चांभार बोर्डिंग (१९१९), शिवाजी वैदिक विद्यालय वसतिगृह (१९२०), श्री. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस (१९२०), सुतार बोर्डिंग (१९२१), नाभिक विद्यार्थी वसतिगृह (१९२१), सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग (१९२०), श्री. देवांग कोष्टी बोर्डिंग (१९२१) अशा रीतीने प्रत्येक जातीला तिच्या शैक्षणिक विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचा व्यावहारिक मार्ग राजर्षी छ. शाहू महाराजांनी जातवार वसतिगृहाची चळवळ उभी करून कार्यवाहीत आणला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात २२ वसतिगृहे स्थापन केली होती. त्यांच्याच कार्यकर्तृत्वाचा ठसा जिल्हयात उमटला असून सध्या मागासवर्गीयांसाठी ५८ वसतिगृहे कार्यरत असून त्यामध्ये जवळजवळ २२१६ विद्यार्थी राहत आहेत.

एकंदरीत राजर्षी छ. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्यांना मानवतेची वागणूक देवून त्यांना चांगल्या प्रकारचे जीवनमान उपलब्ध करून देण्याचा आटोकाट प्रयन केला होता.[१३]

**स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक स्थिती**

कोल्हापूर जिल्हयात मराठा, लिंगायत आणि जैन या समाजातील लोक मोठ्या प्रमाणात राहतात. शिवाय स्वातंत्र्योत्तर काळात सिंधी लोकांची भर पडली आणि जिल्हयाच्या आसपासच्या प्रदेशात हे लोक येऊन स्थायिक झाले आणि येथील लोकजीवनात सहभागी होऊन त्यांनी किराणा भुसार व कापड व्यापारात जवळजवळ आपली मक्तेदारी निर्माण केली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात जिल्हयातील जातीयतेची बंधने ही सैल होत गेली. जिल्हयातील अनुसूचित जातीच्या संख्येत महार (बौध्द धर्मांतर केलेले) या जातीची लोकसंख्या अधिक असून चलवादी जातीची लोकसंख्या कमी आहे. अनुसूचित जाती ह्या शेतमजुरी, खाणकाम, पशुसंवर्धन, मच्छीमारी, शिकार आणि फळबाग इ. व्यवसाय करीत आहेत. त्यामध्ये शेतमजुरी करणा-यांची संख्या अधिक आहे.

जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीमधील कोळी ढोर या जमातीचे लोक चंदगड व राधानगरी तालुक्यात तर पारधी करवीर तालुक्यात आणि काथोडी ह्या जातीचे लोक गगनबावडा, राधानगरी आणि शाहुवाडी या तालुक्यात राहतात. शासनाने जिल्हयातील या लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शैक्षणिक आर्थिक सोयी सवलती देवू केल्या आहेत.

जिल्हयातील स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते. परंतु पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार आणि धंदे व्यवसायातील साक्षरतेची आवश्यकता यातून अलीकडे जिल्हयातील स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होत आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण ७७ टक्के असून ग्रामीण व नागरी भागात हेच प्रमाण ७३ टक्के व ८६ टक्के इतके आहे. कोल्हापूर जिल्हयाचा स्त्री साक्षरतेच्या बाबतीत राज्यात ८ वा क्रमांक लागतो. स्त्री साक्षरतेच्या बाबतीत जिल्हयातील करवीर तालुक्यात सर्वात जास्त ७५ टक्के साक्षरतेचे प्रमाण तर गगनबावडा तालुक्यात सर्वात कमी ६१ टक्के इतके आढळते.

जिल्हयातील जनतेच्या विकासाच्या दृष्टीने विविध सोयी सुविधा निर्माण केल्या आहेत. यामध्ये जिल्हयातील लोकांच्या आरोग्याच्यादृष्टीने शासकीय आरोग्य केंद्रे उभारली आहेत तर शिक्षणाच्या दृष्टीने जिल्हयात २०५४ प्राथमिक शाळा, ५८५ माध्यमिक शाळा, उच्च शिक्षण देणा-या ७७ संस्था तर औद्योगिक व तांत्रिक प्रशिक्षण देणा-या १२ संस्था (शासकीय) आणि अशासकीय ९ अशा २१ औद्योगिक व तंत्रविषयक प्रशिक्षण संस्था शिवाय १०,०८० निरंतर प्रौढ शिक्षण केंद्रेही जिल्हयात कार्यरत आहेत. जिल्हयातील जवळजवळ १२०० शहरे व खेड्यामध्ये विद्युत पुरवठा उपलब्ध करून दिलेला आहे. एकंदरीत पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव, शिक्षणाचा प्रसार, वैज्ञानिक प्रगती व आधुनिक दृष्टिकोन यामुळे जिल्हयातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरामध्ये दिवसेंदिवस परिवर्तन घडून येत आहे. तसेच विविध उपक्रमाद्वारे समाजात एकात्मता निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.[१४]

## स्वातंत्र्योत्तर काळातील कोल्हापूर जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीची वाटचाल

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली अस्पृश्यांच्या चळवळीने आपल्या न्याय हक्काच्या मागणीसाठी जोर धरला होता. स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाने ही अस्पृश्यता मानवजातीला लागलेल्या कलंकाचे निवारण करण्यास आग्रही भूमिका घेतली. राज्यघटनेतील स्वतंत्र अशा १५ व १७ व्या कलमानुसार भेदभावाचा (जात-पात) अभाव अस्पृश्यता पालनास मनाई ह्या तरतुदी करण्यात आल्या. शिवाय १९५५ च्या अस्पृश्यता निवारण कायद्यानुसार अस्पृश्यता पालन करण्यास दंडाची तरतूद करण्यात आली. दलित जाती जमातींना राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात राखीव जागांची तरतूदही करण्यात आली. त्यामुळे या लोकसमुदायात आर्थिक व शैक्षणिक स्थित्यंतर घडून आले. ते पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### आर्थिक व शैक्षणिक स्थित्यंतर

जिल्हयातील अनुसूचित जाती जमातींना आजही त्यांचे परंपरागत स्वरूपाचे व्यवसाय करावे लागत आहेत. त्यांना व्यवसाय स्वातंत्र्य प्राप्त झाले असले तरी ते केवळ शहरी वातावरणापुरतेच. दुर्दैवाने ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमातींना आपल्या व्यवसाय स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत नाही. शासनाकडून मिळणा-या सवलती, राखीव जागा यापेक्षा त्यांना आपल्या भाकरीचा व रोजगारीचा प्रश्न महत्त्वाचा वाटतो आहे.शासनाच्या नोक-यातील राखीव जागांचा लाभ हा केवळ मूठभर लोकांनाच होतो. शहरी वातावरणातदेखील त्यांना स्वत:च्या इच्छेप्रमाणे स्वतंत्र असा व्यवसाय करता येत नाही. कारण व्यवसायासाठी आवश्यक असलेले आर्थिक बळ, भांडवल, व्यावसायिक प्रशिक्षण व शिक्षणाचा अभाव इ. च्या कमतरतेमुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम जीवन जगता येत नाही.

एकंदरीतच अस्पृश्यता ही केवळ शासनाच्या अनेक सोयी सवलती, राखीव जागा इ. नी सुटणारा प्रश्न नाही तर लोकांची मते ही सुधारणेला अनुकूल ठरतील अशी बनविणे आणि त्यांची मानसिकताच समतेच्या तत्त्वाला पूरक ठरेल अशी बनविणे हीच आजच्या काळाची गरज बनली आहे. यासाठी शिक्षण अपरिहार्य आहे. याशिवाय दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी शासनाने जिल्हयात सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर

समाजकल्याण हा स्वतंत्र विभाग निर्माण करून जिल्हयात तशा प्रकारची वाटचाल चालविली आहे. महाराष्ट्र शासनाने १ मे १९८३ रोजी समाजकल्याण हे स्वतंत्र खाते निर्माण केले आहे.[१५]

**समाजकल्याण विभागाची भूमिका**

समाजकल्याण विभागाला शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध होत असते. समाजकल्याण विभाग हा ह्या अर्थसहाय्यातूनच आपल्या जिल्हयात विशेष घटक योजना, जिल्हा परिषद २० टक्के राखीव निधीतील योजना आणि वीस कलमी कार्यक्रम योजना यासारख्या विविध कल्याणकारी योजना ह्या जिल्हयात कार्यान्वित करीत आहे. मुख्यत: खालील उद्देश डोळ्यासमोर ठेवूनच कार्यरत आहे.

१. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाची विविध योजनाद्वारे शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती करून त्यांना इतर पुढारलेल्या वर्गाच्या पातळीवर आणणे.

२. शारीरिक, मानसिक अपंगत्व असलेले निराधार अथवा कुमार्गाला लागलेली ही मुले तसेच भिकारी व गुन्हेगारांचे पुर्नवसन करणे.

३. दुर्बल घटकातील जनतेत आत्मविश्वास निर्माण करणे.

४. त्याचा व्यक्तिगत व आर्थिक विकास करणे.

वरील उद्दिष्टांची अंमलबजावणी व पूर्तता करण्याची जबाबदारी समाजकल्याण विभाग पार पाडीत आहे. याशिवाय समाजकल्याण विभाग जिल्हयात अनेक बाबतीत ठोस पावले उचलत आहे.

**शैक्षणिक**

शैक्षणिक पूर्वस्थितीपासून अनुसूचित जाती जमातीच्या वर्गातील बालकांच्या शिक्षणासाठी अनुकूल वातावरण तयार करून त्यांच्या बालमनावर चांगले संस्कार घडवून पुढारलेल्या समाजातील बालकांच्या बरोबरीने त्यांना सहजीवनाचा लाभ घेत यावा या उद्देशानेच जिल्हयात मागासवर्गीय मुलांसाठी स्वतंत्र बालवाड्यांची योजना समाजकल्याण विभागाने कार्यान्वित केली होती. शासन जिल्हा परिषदेच्या

समाजकल्याण विभागामार्फत ९० टक्के अनुदान या बालवाड्या मधील मुलांसाठी दूध, खाऊ, इमारतीचे भाडे व शिक्षकांचा पगार इ. बाबी विषयक खर्चाच्या तरतुदीसाठी म्हणून देत होते. सन १९८० ते १९८६ सालापर्यंत शासनाने रू. १,५३,११३ इतक्या रक्कमेच्या खर्चाची तरतूद केली होती. समाजकल्याण विभागाची भरीव स्वरूपाची ही कामगिरी होती. परंतु नंतर शासनाने अशा स्वतंत्र स्वरूपाच्या बालवाड्यांऐवजी जिल्हयात अंगणवाड्या, बालवाड्या स्थापन करण्यावर अधिक भर दिला आहे. समाजातील मागासवर्गीय मुलांबरोबर पुढारलेल्या समाजातील मुलांनाही या बालवाड्या, अंगणवाड्यामध्ये प्रवेश दिला जात आहे. आणि या पुढारलेल्या मुलांच्या बरोबरीने अनुसूचित जाती जमातीच्या मुलांच्या मनावर संस्कार करून समाजातील आदर्श नागरिकाचा पाया घडविण्याचे काम या बालवाड्या करीत आहेत.[१६]

कोल्हापूर जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणा-या अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने अनेक आर्थिक सोयी सवलती देवू केल्या आहेत. यामध्ये अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ केले जात आहे. तसेच त्यांची परीक्षा फी, प्रवेश फी अनुदानाच्या स्वरूपात पुन्हा उपलब्ध करून दिली जाते. अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना निवासाची अडचण येवू नये म्हणून जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने जिल्हयात अनेक आश्रमशाळा व वसतिगृहे निर्माण करून त्यामध्ये या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची मोफत सोय केली आहे. याशिवाय अशा मुलांना शिष्यवृत्ती देऊन शैक्षणिक प्रोत्साहन दिलेले आहे. उदाहरणार्थ सन १९८०-८१ पासून १९८५-८६ पर्यंत रू. ३,५१,८०३/- एवढी रक्कम अनुसूचित जाती जमातीतील ७२९० लाभधारक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्याकरीता खर्च केली आहे. सन २०००-०१ पासून ते २००६-०७ पर्यंत जिल्हा परिषदेने शिष्यवृत्त्याकरीता खर्च केलेली रक्कम व लाभार्थी विद्यार्थ्यांची आकडेवारी ही खालील तक्ता क्रमांक २.४ च्या आधारे दर्शविलेली आहे.

**तक्ता क्रमांक २.४**

**शिष्यवृत्तीकरीता खर्च करण्यात आलेली रक्कम २०००-०१ ते २००६-०७**

| अ. नं. | वर्ष | प्रत्यक्ष खर्च (रू. लाखात) | | | लाभार्थी विद्यार्थी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती जमाती | विमुक्त भटक्या जमाती | एकूण | अनुसूचित जाती जमाती | विमुक्त भटक्या जमाती | एकूण |
| १ | २०००.०१ | ५२.६७ | १.७० | ५४.३७ | १२५४० | २४२ | १२७८२ |
| २ | २००१-०२ | ७०.०० | १.७० | ७१.७० | १४२३९ | २३८ | १४४७७ |
| ३ | २००२-०३ | ७४.०० | १.७५ | ७५.७५ | १५८४२ | २५४ | १६०९६ |
| ४ | २००३-०४ | १६९.२८ | १.८९ | १७१.१७ | २८३५७ | २७४ | २८६३१ |
| ५ | २००४-०५ | १७५.१३ | २.०१ | १७७.१४ | २९७५१ | २६८ | ३००६९ |
| ६ | २००५-०६ | १८७.७२ | २.०५ | १८९.७७ | ३१९२९ | ३१४ | ३२२४३ |
| ७ | २००६-०७ | २०३.०९ | २.२२ | २०५.३१ | २९५१३ | ३१८ | २९८३१ |

संदर्भ : जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग, कोल्हापूर

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, सफाई कामगारांच्या मुलांकरीता शिष्यवृत्ती योजना ही सुरूवातीच्या काळात शासनाच्या समाजकल्याण विभागाकडे होती. सन २००१-०२ पासून ती जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत कार्यान्वीत करण्यात येत आहे. सन २००३-०४ पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येऊ लागल्याने जिल्हा परिषदेच्या खर्च रक्कमेत व लाभार्थी विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे बालवाड्यापासून प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणापर्यंतच्या शिक्षणासाठी अनेक प्रकारच्या सोयी सवलती समाजकल्याण विभागातर्फे पुरविल्या जात आहेत.[१७]

## आर्थिक उन्नती

अनुसूचित जाती व विमुक्त भटक्या जमाती समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत (दारिद्रय रेषेखालील) घटकांना नवीन शेती खरेदीसाठी, त्यांच्या मालकीच्या शेतात सुधारणा करण्यासाठी, नवीन विहीर खोदण्यासाठी, जुन्या व नव्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी, उद्योग, व्यवसाय उभारणीसाठी समाजकल्याण विभाग सवलतीच्या

व्याजदराने व अनुदानाच्या रूपाने अर्थसहाय्य करीत आहे. उदाहरणार्थ सन १९८०-८१ व १९८१-८२ पर्यंत दिलेल्या अर्थसहाय्याच्या माहितीचा आढावा तक्ता क्रमांक २.५ च्या आधारे घेऊया.

**तक्ता क्रमांक २.५**

**अनुसूचित जाती व विमुक्त भटक्या जमातींना देण्यात आलेले आर्थिक अर्थसहाय्य**

| वर्ष | योजना | योजनेवरील कर्ज | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | अनुसूचित जाती जमातीतील शेतक-यांना नवीन विहीरी खोदण्यासाठी किंवा जुन्या विहीरीच्या बांधकामासाठी | | |
| | १. अनुसूचित जाती | १५५०० | १३ |
| | २. भटक्या व विमुक्त जमाती | २००० | २ |
| | अनुसूचित जाती जमातींना जमीन सुधारण्यासाठी | | |
| | १. अनुसूचित जाती | ३६००० | १०७ |
| | २. अनुसूचित जमाती (भटक्या विमुक्त जमाती) | ९००० | १६ |
| १९८१-८२ | अनुसूचित जाती जमातीतील शेतक-यांना नवीन विहीरी खोदण्यासाठी किंवा जुन्या विहीरीच्या बांधकामासाठी | | |
| | १. अनुसूचित जाती | २४००० | २४ |
| | २. अनुसूचित जमाती (भटक्या विमुक्त जमाती) | ४००० | २ |
| | अनुसूचित जाती जमातींना जमीन सुधारण्यासाठी | | |
| | १. अनुसूचित जाती | १८०० | ८० |
| | २. भटक्या विमुक्त जमाती | ३००० | ४ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, चौधरी एम. ए. १९८८

या योजनामुळे जिल्हयातील अनेक अनुसूचित जाती, जमातीच्या लाभधारकांचा फायदा झालेला आहे हे दिसून येते. परंतु वरील योजना शासनाने १९८३-८४ पासून बंद केल्या. या योजना बंद केल्या असल्या तरीही जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत आजही अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी जिल्हयात विशेष योजना ही राबविण्यात येत आहेत.[१८]

**विविध कल्याणकारी योजनेची भूमिका**

अनुसूचित जाती व विमुक्त भटक्या जमातीच्या सर्वांगीण विकासाकरिता कोल्हापूर जिल्हा हा विविध कल्याणकारी योजना राबवित आहे. यामध्ये

१. जिल्हयातील लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, तालुका पंचायत, स्थानिक स्वराज्य संस्था वगैरेत राखीव प्रतिनिधीत्व ठेवले गेले आहे.

२. सरकारी, खाजगी नोक-यात राखीव जागांची तरतूद केली आहे.

३. पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून जिल्हयातील मागासवर्गीयांसाठी उत्तरोत्तर अधिक व्यापक योजना आखून त्यासाठी अधिक निधी राखून ठेवण्याची तरतूद केली जात आहे.

४. जिल्हयातील अस्पृश्यता निर्मूलन कार्यक्रमांतर्गत "हरिजन सप्ताह" आणि "हरिजन दिवस" पाळून अस्पृश्यता निर्मूलन विरोधी अभिवृत्ती तयार केली जात आहे.

५. जिल्हयातील अस्पृश्यता निर्मूलनार्थ हरिजन सेवक संघ व गाडगे महाराज इ. सारख्या अस्पृश्यता निवारक ऐच्छिक संघटनांना प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ पुरविले जात आहे.

६. जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन, वयाच्या अटीत शिथीलता, शिष्यवृत्त्या, मुलाखतीकरिता येण्या-जाण्याचा खर्च इ. बाबतीत सवलती दिल्या जात आहेत.

७. जिल्हयातील अनुसूचित जाती जमातींना विविध योजनातंर्गत घरे बांधून देण्यासाठी समाजकल्याण विभागाकडून आर्थिक मदत दिली जात आहे.

८. जिल्हयातील प्रसिध्दी विभागामार्फत निरनिराळे चित्रपट, माहितीपट, प्रदर्शने, पुस्तके, दूरचित्रवाणी, नभोवाणी इ. च्या मदतीने या प्रश्नाचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

९. याशिवाय जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीच्या आर्थिक उन्नतीसाठी शेती, उद्योगधंद्यासाठी मदत तर हस्त उद्योग व्यवसायाचे प्रशिक्षण आणि त्यासाठी कर्ज पुरवठ्याच्या सोयी सवलती जिल्हयात उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

या कल्याणकारी योजनेच्या आधारे जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीचा वैयक्तिक आणि सामाजिक दर्जा उंचाविण्याचा प्रयत्न केला जात आहे.[१९]

**विशेष घटक योजना**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी घटनात्मक तरतुदी/मार्गदर्शक तत्त्वे आणि केंद्र शासनाच्या अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या राष्ट्रीय अभ्यासगटाचे अमूल्य मार्गदर्शन आणि त्याचप्रमाणे समाजकल्याण/विशेष घटक योजना अभ्यासगट क्र. २२ (नववी पंचवार्षिक योजना, महाराष्ट्र शासन) च्या मार्गदर्शनाखाली विशेष घटक योजना तयार करण्यात आली आहे. राज्याच्या एकूण अर्थसंकल्पीय रक्कमेच्या दहा टक्के रक्कम विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या कल्याणाच्या विविध कल्याणकारी, वैयक्तिक व सामाजिक योजनांवर खर्च केला जातो.[२०]

**सामाजिक हितरक्षण**

भारतीय संविधान कलम १७ अन्वये अस्पृश्यता संपुष्टात आणली असून कोणत्याही स्वरूपातील अस्पृश्यता सदरहू कलमान्वये निषिध्द मानली गेली आहे. कोणत्याही दबावाखाली अस्पृश्यतेच्या पालनापायी निर्माण होणारे अपंगत्व हे कायद्यानुसार दंडनीय अपराध ठरेल. सदरहू कलमास विधिवत अधिष्ठान प्राप्त व्हावे म्हणून संसदेने अस्पृश्यता (गुन्हे) अधिनियम १९५५ पारीत केला. सदरच्या नियमाअंतर्गत असलेल्या तरतुदी अधिक प्रभावशाली व्हाव्यात यासाठी सदरहू अधिनियमात १९८६ साली सुधारणा करण्यात आल्या आणि त्याचे नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ असे नामाभिदान करण्यात आले. केंद्र शासनाने अधिनियमातील तरतुदीनुसार नागरी हक्क नियमावली १९७७ अधिसूचित केली आहे. शासनाच्या असे निदर्शनास आले की, अनुसूचित जाती जमातीवर होणा-या अत्याचारांची सर्व प्रकरणे नागरी हक्क

संरक्षण अधिनियमांतर्गत येत नाहीत. त्यामुळे सन १९८९ मध्ये संसदेने अत्याचार निवारणाकामी अनुसूचित जाती (अत्याचार निवारण) अधिनियम १९८९ पारीत केला. सदर अधिनियमाची अंमलबजावणी ही ३० जानेवारी १९९० पासून अंमलात आली. सदरहू अधिनियमांतर्गत असलेल्या तरतुदी अनुसूचित जाती जमाती (अत्याचार निवारण) नियमावली अन्वये केंद्र शासनाने दि. ३० मार्च १९५५ अन्वये अधिसूचित केल्या आहेत.१९ त्याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.[२१]

**उद्दिष्टे**

अनुसूचित जातींच्या लोकांचा जलद विकास करण्यासाठी पुढीलप्रमाणे उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

१. अनुसूचित जातींच्या व्यक्तींच्या ताब्यातील मालमत्तेचे संवर्धन करणे.

२. अनुसूचित जातींच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मालमत्तांचे हस्तांतर/पुरवठा करणे.

३. अनुसूचित जातींच्या लोकांची रोजगारीता उत्पादकता वाढीसाठी तंत्रातील सुधारणा, नवतंत्र आत्मसात करणे.

४. अनुसूचित जातींच्या शेतमजुरांना किमान वेतनाची हमी आणि त्यांचे शोषणापासून संरक्षण करणे.

५. प्राथमिक शिक्षण आणि साक्षरता अभियानांतर्गत ३५ वर्षापर्यंतच्या अनुसूचित जातीच्या प्रत्येक व्यक्तीस किमान साक्षर करणे आणि किमान रोजगाराभिमुख कौशल्य आत्मसात करण्यास सहाय्य करणे.

६. अनुसूचित जातींच्या व्यक्तींना विशेष शैक्षणिक, तांत्रिक अर्हता प्राप्त करण्यास तसेच अस्तित्वात असलेल्या नव्याने निर्माण होणा-या नोकरींच्या उपलब्धतेबाबत मदत करणे.

७. अनुसूचित जातीच्या बेकार व्यक्तींना उद्योजकता प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

८. स्वयंरोजगार कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यापार, उद्योग, वाणिज्य इ. क्षेत्राबद्दल मार्गदर्शन करणे.

९. कातडे कमावणे (टॅनिंग) आणि चर्मोद्योग या पारंपरिक पध्दतीच्या व्यवसायामध्ये आधुनिकीकरण करणे.

१०. म्हेतर समाजातील व्यक्तींना त्यांच्या मैला साफ करणे या पारंपरिक अस्वच्छ कामापासून मुक्ती मिळण्याचे प्रयत्न करणे.

११. अनुसूचित जातींच्या वस्त्यांमध्ये किमान गरजेच्या तसेच अत्यावश्यक सुविधांचा पुरवठा करणे.

वरील उद्दिष्टांची पूर्तता शासनाच्या विशेष घटक योजनेअंतर्गत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.[२२]

**विविध योजना**

अनुसूचित जाती, विमुक्त भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या लाभार्थ्यांसाठी विशेष समाजकल्याण अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या समाजकल्याग अधिका-यामार्फत विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची व त्यांचा लाभ घेण्यासाठी असलेल्या निकषांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**१. योजना क्रमांक १ : स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदान**

स्वयंसेवी संस्थामार्फत मागासवर्गीय मुलांमुलींसाठी अनुदानित वसतिगृहाची योजना राबविण्यात येते. ही योजना समाजकल्याण विभागांतर्गत असली तरी जिल्हा परिषदेमार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. सदर योजनेच्या माध्यमातून इयत्ता ८ वी ते १० वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. प्रत्येक विद्यार्थ्यामागे रू. ५००/- दरमहा संस्थेस अनुदान देण्यात येते. वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना भोजन व निवासाची सोय मोफत केली जाते. कोल्हापूर जिल्हयातील एकूण ४३ वसतिगृहामध्ये १४४६ मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

२. **योजना क्रमांक २ : मागासवर्गीय मुलामुलींच्या अनुदानित वसतिगृहाच्या इमारत बांधकामास अनुदान (केंद्र शासन पुरस्कृत)**

बांधकामासाठी अनुदान देण्यात येते. परंतु नवीन बांधकासाठी अनुदान देण्याची तरतूद नाही. यामध्ये विद्यार्थ्यांच्या राहण्याची तसेच भोजन गृह, स्वयंपाक गृह, सर्वसामान्य सभागृह इ. सोयी करता येतात.

सन १९९४-९५ पासून मागासवर्गीय मुलांमुलींच्या वसतिगृहसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने जे दर प्रमाणित केलेले आहेत त्या दोन्ही दरामधील जे दर कमीत कमी असतील त्या दरापमाणे प्रस्तावित इमारतीच्या बांधकामाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करून जी रक्कम येईल त्या रक्कमेच्या ४५ टक्के रक्कम केंद्र शासन व ४५ टक्के रक्कम राज्य शासनामार्फत वसतिगृहासाठी अनुदान देण्यात येते व उर्वरित १० टक्के रक्कम स्वत: संस्थांनी खर्च करावयाची आहे.

३. **योजना क्रमांक ३ : मागासवर्गीय मुले व मुली तसेच मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलींसाठी शासकीय वसतिगृह उघडणे व त्यांचे परिरक्षण करणे.**

मागासवर्गीय मुलामुलींना शिक्षणाची सोय व्हावी. तसेच त्यांना उच्च शिक्षण घेता यावे. त्याचप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी शासकीय वसतिगृहे शासनामार्फत उघडण्यात आलेली आहेत.

सदर योजनेअंर्तगत कोल्हापूर जिल्हयात तालुका पातळीवर १० शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. त्यामध्ये ६ मुलांची व ४ मुलींची असून त्यांची मान्य संख्या ७३० आहे. सदर वसतिगृहामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. यामध्ये अनुसूचित जाती, जमाती, अपंग, अनाथ, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यापैकी विद्यार्थी असावेत. उत्पन्नाची अट रू. ६५२९०/- आहे. शासकीय वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची सोय विनामूल्य केली जाते. विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, स्टेशनरी मोफत पुरविली जाते.

**४. योजना क्रमांक ४ : मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदान करणे (प्राथमिक व माध्यमिक)**

अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यताप्राप्त शिक्षणासाठी शुल्क माफी देण्यात येते. यामध्ये प्रवेश शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, क्रीडा शुल्क इ. चा समावेश आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याची आवश्यकता नाही तर शिक्षण संस्थेने विद्यार्थ्यांच्या यादीसह माहिती मंजूर करणा-या अधिका-याकडे पाठवावयाची आहे.

**५. योजना क्रमांक ५ : माध्यमिक शाळेत शिकणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती**

मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेत शिक्षण घेणा-या गुणवत्ता प्राप्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. वार्षिक परीक्षेमध्ये वर्गात मागासवर्गीयात प्रथम दोन क्रमांक प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांने ५० टक्के किंवा त्याहून अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांला रू. २० दरमहा प्रमाणे १० महिने व इयत्ता ८ वी ते १० करिता रू. ४० दरमहा प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

**६. योजना क्रमांक ६ : इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती**

मागासवर्गीय मुलींमध्ये प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आढळून येते. ते कमी व्हावे व उपस्थिती वाढावी म्हणून इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या सर्व मागासवर्गीय मुलींना ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय आहे. या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय मुलींना उत्पन्नाची किंवा गुणाची अट नाही. इयत्ता ५ वी ते ७ वी रू. ३० प्रमाणे दरमहा शिष्यवृत्ती दिली जाते.

### ७. योजना क्रमांक ७ : इयत्ता ८ वी ते १० मध्ये शिकणा-या अनुसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

इयत्ता ८ वी ते १० मधील अनुसूचित जातीच्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे याकरिता सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सन २००३-०४ पासून सुरू करण्यात आली आहे. ही योजना शासकीय/मान्यताप्राप्त/जिल्हा परिषद/नगरपालिका/ महानगरपालिका/अनुदानीत/विनाअनुदानीत/प्राथमिक/माध्यमिक मान्यताप्राप्त शाळातील इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणा-या अनुसूचित जातीच्या मुलींकरिता आहे. ही योजना गुणवत्ता शिष्यवृत्ती व्यतिरिक्त राहील. शिष्यवृत्तीकरिता उत्पन्नाची व गुणांची अट राहणार नाही. मुलींना अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच जातीच्या दाखल्याची अट नाही. शाळेच्या मुख्याध्यापकाने सही शिक्क्यानिशी माहिती सादर करावयाची आहे. सदर शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी ते १० वी रू. १०० दरमहा १० महिन्याकरिता (जून ते मार्च) देण्यात येते.

सदर शिष्यवृत्ती वर्षातून तीन वेळा मंजूर करून दि. २६ जुलै, २२ सप्टेंबर व ३ जानेवारी या दिवशी मुलींना संबंधित ग्रामपंचायतीकडून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते समारंभपूर्वक देण्यात येते.

### ८. योजना क्रमांक ८ : अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती

भंगी व्यवसायात म्हेतर व्यवसायात कातडी सोलणे, कातडी कमाविणे हे व्यवसाय करणा-या पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिक्षण उच्च व चांगल्या शाळेमध्ये घेता यावे या उद्देशाने केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाखाली ही योजना राबविली जाते. सदर योजनेकरिता विद्यार्थ्यांचे पालक अस्वच्छ व्यवसायात काम करत असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदर योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांना ते वसतिगृहात रहात असल्यास खालील दराने शिष्यवृत्ती देण्यात येते.

इयत्ता ३ री ते ८ वी रू. २००/- दरमहाप्रमाणे (१० महिन्याकरिता)
इयत्ता ९ वी ते १० रू. २५०/- दरमहाप्रमाणे (१० महिन्याकरिता)
बिगर वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांकरिता

इयत्ता १ ली ते ५ वी रू. २५/- दरमहाप्रमाणे (१० महिन्याकरिता)
इयत्ता ६ वी ते ८ वी रू. ४०/- दरमहाप्रमाणे (१० महिन्याकरिता)
इयत्ता ९ वी ते १० वी रू. ५०/- दरमहाप्रमाणे (१० महिन्याकरिता)
याशिवाय अधिक रू. ५८०/- देण्यात येतात.

## ९. योजना क्रमांक ९ : औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षणार्थीना विद्यावेतन प्रदान करणे

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाकडे वळविण्याकरिता औद्योगिक शिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना हे विद्यावेतन दिले जाते. हे विद्यावेतन संस्थेच्या प्राचार्यामार्फत अदा केले जाते. सदर योजनेकरिता विद्यार्थी अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमातीचा असावा. विद्यार्थी मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकणारा असावा. विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रू. १२०००/- च्या आत असावे. या योजनेखाली औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणारे निवासी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संचालक, तांत्रिक शिक्षण यांचेकडून दरमहा रू. ४०/- विद्यावेतन व समाजकल्याण खात्यामार्फत दरमहा रू. ६० जादा विद्यावेतन असे एकूण दरमहा रू. १००/- देण्यात येतात. निवासी विद्यार्थ्यांना संचालक, तांत्रिक शिक्षण यांचेकडून काही विद्यावेतन दिले जात नाही. अशा विद्यार्थ्यांना समाजकल्याण खात्यामार्फत दरमहा रू. १००/- विद्यावेतन दिले जाते. अनिवासी प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण दरमहा रू. ४०/-, समाजकल्याण विभागामार्फत रू. २०/- चे जादा विद्यावेतन असे एकूण रू. ६०/- दरमहा विद्यावेतन देण्यात येते.

## १०. योजना क्रमांक १० : आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य

मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय युवक युवतींच्या मनात ममतेच्या भावनेतून समता रुजावी, त्यांच्यात राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी, समाज एकसंघ रहावा व त्यांच्यात मातृभाव निर्माण होवून जाती निर्मूलन व्हावे म्हणून ही योजना राबविली जाते. त्यासाठी आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना महाराष्ट्र शासनामार्फत प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत केली जाते. सदर योजनेखाली संबंधित आंतरजातीय विवाहीत दांपत्याचा सत्कार शासनामार्फत केला जातो आणि विवाहीत जोडप्यास रू. १५,०००/- पर्यंत अनुदान दिले जाते. त्यामध्ये रू. ७,५००/- ठेवीच्या स्वरूपात,

रू. ७,०००/- रोख, रू. ४०० रक्कमेची संसारोपयोगी भांडी व रू. १०० चा सत्कार समारंभ केला जातो.

## ११. योजना क्रमांक ११ : दलित वस्ती सुधारणा योजना

दलित वस्ती सुधारणा योजना एक भाग म्हणून ग्रामीण भागातील अनुसूचित जातीच्या वस्त्या मधील मूलभूत गरजा भागवण्यासाठी प्रत्येक दलित वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान देण्यात येते. यामध्ये प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, स्वच्छता गृहे, विजेच्या दिव्यांची सोय, अंतर्गत रस्ते, गटर्स, समाज मंदिरे या प्रकारची कामे घेण्यात येतात.

## १२. योजना क्रमांक १२ : तांडा वस्ती सुधार योजना

महाराष्ट्रात भटक्या जमातीच्या अनेक जाती जमाती अजूनही भटकंती करून स्थलांतरित स्वरूपाचे जीवन जगतात. लमाण, वंजारा, धनगर, पारधी अशा अनेक समुहाच्या तांडे वस्त्या असून या तांड्यामध्ये या जमाती अनेक वर्षे राहतात. अशा तांडा वस्तींना प्राथमिक सुविधा उपलब्ध होत नाहीत. या समाजास स्थिर जीवन जगता यावे याकरिता सुधारणा होणे आवश्यक आहे. म्हणून दलित वस्ती सुधारणा योजनेच्या धर्तीवरच ही योजना राबविण्यात येते. सदरील योजना २००३-०४ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

१. ५० ते १०० लोकसंख्या असलेल्या वस्त्या रू. २ लाख

२. १०० ते १५० लोकसंख्या असलेल्या वस्त्या रू. ३ लाख

३. १५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेले तांडे वस्त्या रू. ५ लाख

## १३. योजना क्रमांक १३ : अनुसूचित जातीच्या मुलांमुलींसाठी निवासी शाळा

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील बहुसंख्य व्यक्ती या शेतमजूर किंवा लहान सीमांत शेतकरी असल्याने त्यांची आर्थिक स्थिती लक्षात घेता त्यांना त्यांच्या मुलांना शाळेत पाठवून त्यांचा शैक्षणिक विकास घडवून आणणे अत्यंत कठीण जाते. म्हणून अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने निवासी शाळा सुरू करण्याची योजना शासनाने सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेली आहे. सदरची योजना समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्यामार्फत

राबविली जाते. या विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासन (जिल्हा परिषद) आपल्या विशेष योजनेअंतर्गत खर्चाच्या रक्कमेची तरतूद करीत असते. शासनाचा समाजकल्याण विभाग विशेष घटक योजनेअंतर्गत खर्चाच्या रक्कमेची तरतूद करीत असतो. ते तक्ता क्रमांक २.६ मध्ये दर्शविलेले आहे.[२३]

**तक्ता क्रमांक २.६**

**विशेष घटक योजना २००५-०६**

| अ. क्र. | मुख्य विकास शीर्ष | उपलब्ध आर्थिक तरतूद | झालेला खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | कृषी व संलग्न सेवा | १९८.६३ | १९८.६३ | १०० टक्के |
| २ | ग्रामीण विकास | ४२९.१९ | ३९१.१४ | ९१ टक्के |
| ३ | पाटबंधारे व पूर नियंत्रण | -- | -- | -- |
| ४ | विद्युत विकास | ५०.०० | ५०.०० | १०० टक्के |
| ५ | उद्योग व खाणकाम | ३.९५ | ३.९५ | १०० टक्के |
| ६ | वाहतूक व दळणवळण | ८६.९७ | ८६.९७ | १०० टक्के |
| ७ | सामान्य आर्थिक सेवा | -- | -- | -- |
| ८ | सामाजिक व सामूहिक सेवा | ७६८.७४ | ७३०.६९ | टक्के |
| i | सामान्य शिक्षण | १५.९२ | १५.९२ | १०० टक्के |
| ii | क्रीडा व युवक कल्याण | १७.०० | १७.०० | १०० टक्के |
| iii | कला व संस्कृती | -- | -- | -- |
| iv | तांत्रिक शिक्षण | ०.६७ | ०.६७ | १०० टक्के |
| v | आरोग्य | -- | -- | -- |
| vi | गृह निर्माण | -- | -- | -- |
| vii | ग्रामीण पाणी पुरवठा स्वच्छता | ६८.८३ | ६८.८३ | १०० टक्के |
| viii | नगरविकास | ३०० | ३०० | १०० टक्के |
| ix | माहिती व प्रसिध्दी | १.०० | १.०० | १०० टक्के |
| x | मागासवर्गीय कल्याण | ५४६.२३ | ५४६.२३ | १०० टक्के |
| xi | समाजकल्याण | १५.०० | १५.०० | १०० टक्के |
| xii | कामगार व कामगार कल्याण पोषण | ३.०४ | ३.०४ | १०० टक्के |
| xiii | विशेष केंद्रिय सहाय्य | | | |
| | एकूण आठ | ७६८.७४ | ७३०.६९ | टक्के |
| | एकूण १ ते ८ | ९६७.६९ | ९६७.६९ | १०० टक्के |

संदर्भ : समाजकल्याण विभाग, कोल्हापूर

एकंदरीतच शासनाच्या समाजकल्याण विभागाने मागासवर्गीयांसाठी मागील विशेष घटक योजनेअंतर्गत विविध घटकांवर रक्कम खर्च केली आहे. सन २००६-०७ या आगामी वर्षाच्या विशेष घटक योजनेकरिता कोल्हापूर जिल्हयास रू. २६१२.०० लाख रक्कमेची वित्तीय मर्यादा शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने दिलेली आहे. त्या विशेष घटक योजनेअंतर्गत खालील सेवा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.[२४]

**तक्ता क्रमांक २.७**

**विशेष घटक योजना २००६-०७**

| अ. क्र. | मुख्य विकास शीर्ष | मंजूर नियत व्यय | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १ | कृषी व संलग्न सेवा | २३६.७८ | २१४.८३ |
| २ | ग्रामीण विकास | ४४०.६३ | ४४०.६३ |
| ३ | पाटबंधारे व पूर नियंत्रण | -- | -- |
| ४ | विद्युत विकास | ५०.०० | ५०.०० |
| ५ | उद्योग व खाणकाम | ४.५५ | ६.१५ |
| ६ | वाहतूक व दळणवळण | १००.०० | ३००.०० |
| ७ | सामान्य आर्थिक सेवा | -- | -- |
| ८ | सामाजिक व सामूहिक सेवा | ९४९.०४ | १००४.२९ |
| i | सामान्य शिक्षण | २८.०८ | २७.०८ |
| ii | क्रीडा व युवक कल्याण | १७.०० | २२.०७ |
| iii | कला व संस्कृती | -- | -- |
| iv | तांत्रिक शिक्षण | १३.०१ | १३.०१ |
| v | आरोग्य | -- | -- |
| vi | गृह निर्माण | -- | -- |
| vii | ग्रामीण स्वच्छता व पाणी पुरवठा | १६३.०० | ६३.०० |
| viii | नगरविकास | ३००.०० | ३००.०० |
| ix | माहिती व प्रसिध्दी | १.०० | १.०० |
| x | मागासवर्गीयासाठी कल्याणकारी योजना | ४०१.०२ | ४५७.२७ |
| xi | समाजकल्याण | १५.०० | १५.०० |
| xii | कामगार व कामगार कल्याण पोषण | १०.९३ | १०.९३ |
| xiii | विशेष केंद्रिय सहाय्य | | |
| | एकूण आठ | ९४९.०४ | १००४.२९ |
| | एकूण १ ते ८ | १७८१.०० | २०१५.९० |

संदर्भ : समाजकल्याण विभाग, कोल्हापूर [२५]

**गट क्रमांक १ : कृषी व संलग्न सेवा**

यामध्ये मागासवर्गीय व नवबौध्द शेतक-यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी विशेष सहाय्य योजना, फलोत्पादन, इतर पिकांसाठी तुषार व ठिबक सिंचन, मृदा संधारण, पशू संवर्धन, दुग्ध आणि मत्स्य व्यवसाय, वने इ. चा समावेश केला आहे.

**गट क्रमांक २ : ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम**

या अंतर्गत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम यामध्ये

१. स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

२. इंदिरा आवास योजना

३. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना

४. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम केंद्र इ. चा समावेश होत असून जिल्हयात इंदिरा आवास योजनेअंतर्गत अनेक घरे बांधण्यात आली. तर ग्रामीण स्वच्छता योजनेअंतर्गत जिल्हयातील रस्त्याचे डांबरीकरण, शौचालये बांधणे, ठिकठिकाणी कच-याच्या पेट्या बसविणे इ. कार्यक्रम या योजनेअंतर्गत पार पाडण्यात येत आहेत.

**गट क्रमांक ३ : पाटबंधारे व पूर नियंत्रण**

यामध्ये जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीच्या अयशस्वी विहिरींना अनुदान देण्याचे काम या विशेष घटक योजनेअंतर्गत पार पाडण्यात येत आहे.

**गट क्रमांक ४ : विद्युत विकास**

यामध्ये नागरी क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्दांना मोफत घरगुती वीज कनेक्शन देण्यात येत आहे. याशिवाय त्यांच्या मालकीच्या विहिरीवर विद्युत मोटारी बसविण्याचे कामही या विशेष योजनेअंतर्गत जिल्हयात पार पाडण्यात येते.

15147

**गट क्रमांक ५: उद्योग व खाणकाम**

यामध्ये जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीच्या उद्योग करू इच्छिणा-या घटकांसाठी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, सुशिक्षित बेरोजगारीसाठी बीज भांडवल पुरविणे, अर्थसहाय्य करणे, छोट्या उद्योगधंद्याकरिता कर्ज पुरविणे इ. कार्यक्रम या योजनेअंतर्गत जिल्हयात पार पाडले जात आहेत.

**गट क्रमांक ६ : वाहतूक व दळणवळण**

यामध्ये दलित वस्त्यांना जोडणारे जोडरस्ते बांधणे, साकव बांधणे, इ. कामे या योजनेअंतर्गत जिल्हयात पार पाडली जात आहेत.

**गट क्रमांक ७ : सामाजिक सामूहिक सेवा**

१. सामान्य शिक्षण : या अंतर्गत प्राथमिक शाळेतून पुस्तक पेढ्या उघडणे, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या भागामधील प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलत देणे, दुर्बल घटकातील व अनुसूचित जाति जमातीतील मुलांना शाळेत नियमित येण्यासाठी भत्ता देणे, १०३ विकास गटातील इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देणे, १०३ विकास गटातील इयत्ता १ ली च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेष व लेखन साहित्य पुरविणे, याशिवाय माध्यमिक शाळेतून पुस्तक पेढ्या उघडणे इ. कामे जिल्हयातील विशेष घटक योजनेअंर्तगत पार पाडण्यात येत आहेत.

२. क्रीडा व युवक कल्याण : या अंतर्गत व्यायामशाळा विकास, क्रीडांगण विकास, गाव तेथे मैदान व व्यायामशाळा उभारणे आणि समाजसेवा शिबीरे भरविणे इ. स्वरूपाची कामे या योजनेअंतर्गत जिल्हयात विशेष घटक योजनेअंतर्गत पार पाडण्यात येत आहेत.

३. तंत्र शिक्षण : या अंतर्गत अधिक दोन स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना हत्यारे व पुस्तके पुरविणे, तंत्र माध्यमिक शालांत पूर्ण तांत्रिक व्यावसायिक

शिक्षणाच्या सुविधात वाढ करणे इ. स्वरूपाची कामे जिल्हयात पार पाडण्यात येत आहेत.

४. पाणी पुरवठा व स्वच्छता : या अंतर्गत नळाने पाणी पुरविण्यासाठी बोअरवेल, विहीर इ. ची खास सोय केली जाते तर विहीर बांधणे आणि उंच क्षमतेच्या विधंन विहिरीवर विद्युत पंप बसविणे इ. स्वरूपाची कामे जिल्हयात पार पाडण्यात येत आहेत.

५. नगरविकास : नागरी दलित वस्त्यांमध्ये सोयी सुविधा पुरविणे, वस्त्यांमध्ये दिवाबत्ती सोय, पाणी पुरवठा करण्यासाठी बोअर काढणे, वस्त्यांमध्ये शौचालय उभारणे इ. स्वरूपाच्या सुधारणा करण्याचे काम दलित वस्त्यांमध्ये नगरविकास योजनेअंतर्गत करण्यात येते.

६. मागासवर्गीय कल्याण : या अंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क देणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणे, माध्यमिक शाळेतून शिकणा-या मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, मुलांमुलींसाठी शासकीय वसतिगृह सुरू करणे व देखभाल करणे, मागासवर्गीय मुलांमुलींसाठी वसतिगृह इमारतीचे बांधकाम करणे, व्यावसायिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे, मागासवर्गीय वसतिगृहांना सहाय्यक अनुदान देणे, मॅट्रीकनंतरच्या मागासवर्गीय विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देणे, मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण मंडळास वित्तीय सहाय्य देणे, दलित वस्त्यांची सुधारणा करणे, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणे, गलिच्छ व्यवसायात असलेल्या मुलांना शालांत पूर्व परीक्षेसाठी शिष्यवृत्ती देणे, इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणा-या मागासवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती देणे, अनुसूचित जाती जमाती वैद्यकीय आणि वास्तुशास्त्र शाखेतील पेमेंट कोट्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ४ टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करून देणे, पुस्तक पेढ्या काढणे, सावित्रीबाई फुले

शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना देणे, कन्यादान योजना राबविणे, अनुसूचित जाती जमातीतील उमेदवारांसाठी मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना राबविणे, स्वयंसेवी संस्थांच्यामार्फत चालविण्यात येणा-या अनुसूचित जातीच्या निवासी शाळांना सहाय्यक अनुदान देणे, इ. स्वरूपाच्या विविध कल्याणकारी योजना समाजकल्याण विभागातील विशेष घटक योजनेअंतर्गत जिल्हयात राबविण्यात येत आहेत आणि या योजनेअंतर्गत आतापर्यंत अनेक दलित वस्त्यांची सुधारणा, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क माफी, वसतिगृहांच्या संख्येत वाढ, पाणी पुरवठा सोय आणि इंदिरा आवास योजनेअंतर्गत घरे बांधणी अशी अनेक स्वरूपाची कामे ही जिल्हयात पार पाडली आहेत.

एकंदरीतच जिल्हयातील समाजकल्याण विभागाच्या विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती जमातीच्या सर्वांगीण विकासावर अधिक भर देण्यात आलेला आहे. यामध्ये एखादाही घटक दुर्लक्षित केलेला नाही हे या विशेष घटक योजनेचे वैशिष्ट्य मानावे लागेल. शासनाच्या या विशेष घटक योजनेमुळेच जिल्हयातील अनुसूचित जाती जमातीच्या परिस्थितीत काही प्रमाणात बदल घडून येत आहेत. याशिवाय जिल्हा परिषद आपल्या २० टक्के राखीव निधीतूनही विविध कल्याणकारी योजना जिल्हयात राबवित आहे. त्या पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

**जिल्हा परिषद २० टक्के राखीव निधीतील योजना**

**योजना क्रमांक १ : मागासवर्गीय हरिजन गिरीजन भटके विमुक्त अशा बेघर व्यक्तींना घरे बांधून देणे**

मागासवर्गीय बेघर व्यक्तींना कायमस्वरूपी निवारा उपलब्ध करून कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रू. ३२,५००/- असलेल्या बेघर व्यक्तींना बांधकाम करण्यास रू. २०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य करणे.

**योजना क्रमांक २ : मागासवर्गीय समाजमंदीर बांधकाम दुरुस्तीस मदत**

ग्रामीण भागातील हरिजनवाड्यामध्ये जेथे पूर्वीची समाजमंदिरे आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी आणि जी समाजमंदिरांची कामे जिल्हा परिषदेने केली असतील आणि ती अपूर्ण असतील अशी कामे पूर्ण करून त्या इमारती मागासवर्गीय समाजासाठी उपयोगात आणण्यासाठी जिल्हा परिषद फंडातून अर्थसहाय्य दिले जाते. अंदाजपत्रकाच्या ५० टक्के किंवा रू. २५,०००/- यापैकी कमी, पंचायत समिती ३० टक्के व ग्रामपंचायत २० टक्के या धर्तीवर योजना राबविण्यात येते.

**योजना क्रमांक ३ : ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थी विद्यार्थिनींना संगणक प्रशिक्षण देण्यास अर्थसहाय्य**

कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमाती, विमुक्त भटक्या जमाती अशा गरीब दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील हुशार विद्यार्थी विद्यार्थिनींना आर्थिक परिस्थिती अभावी संगणक प्रशिक्षण घेता येत नाही अशा विद्यार्थी विद्यार्थिनींना संगणक प्रशिक्षणाच्या फी चा खर्च भागविण्यासाठी अनुदान स्वरूपामध्ये रू. ३०००/- किंवा शासन मान्यताप्राप्त प्रशिक्षण केंद्रातील प्रत्यक्ष फी अर्थसहाय्य म्हणून त्यापैकी जी कमी असेल ती मंजूर करण्यात येईल.

**योजना क्रमांक ४ : ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थींना छोट्या उद्योगधंद्यासाठी आर्थिक मदत (पुरुष - महिला)**

ग्रामीण भागातील अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या उन्नतीसाठी, छोट्या उद्योगधंद्यासाठी अर्थसहाय्य करून त्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांचा कौटुंबिक दर्जा उंचाविणे या उद्देशाने जिल्हा परिषद २० टक्के निधीतून समाजकल्याण विभागामार्फत लाभार्थ्यांना रू. ३०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते.

**योजना क्रमांक ५ : मागासवर्गीय मुलांमुलींना सायकल वाटप करणे (इयत्ता ५ वी ते १० वी)**

ग्रामीण भागातील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना लांब पल्ल्याच्या दोन ते तीन कि. मी. अंतरावरील शाळेस जाण्यासाठी सायकल वाटप केले जाते.

**योजना क्रमांक ६ : मागासवर्गीय पुरुष व महिलांना शिवण यंत्र वाटप करणे**

ग्रामीण भागातील मागासवर्गीय पुरुष व महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी व त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी त्यांना मोफत शिवण यंत्रे पुरविण्यात येतात.

**योजना क्रमांक ७ : मागासवर्गीय महिलांना स्वयंरोजगारासाठी उपजीविकेचे साधन म्हणून घरघंटी पुरविणे**

ग्रामीण भागातील मागासवर्गीय अनुसूचित जाती जमातीच्या महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यासाठी घरगुती विजेवर चालणारी घरघंटी (दळप सयंत्र) पुरविणे, कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यासाठी जिल्हा परिषदेच्या २० टक्के निधीतून १०० टक्के अनुदानातून ही योजना राबविण्यात येते.

**योजना क्रमांक ८ : मागासवर्गीय लोकांना घरदुरुस्तीसाठी आर्थिक सहाय्य**

ग्रामीण भागातील मागासवर्गीय लोकांच्या समाजाची बहुतांशी घरे ही कच्च्या मातीची कुडाची असतात व अगदी अपुरी असतात. अशी घरे टिकावू नसल्याने ती पडतात आणि नुकसान होते. त्यांना घर दुरुस्त करता येत नाही म्हणून ते कसेतरी मोडक्या जीर्ण घराच्या आश्रयात आपले जीवन घालवितात. पुष्कळ वेळा निसर्गाच्या तडाख्याने गंभीर संकट कोसळते. अशा कुटुंबाना त्या कुडाच्या पालाच्या छपरामध्ये निवारा द्यावा लागतो म्हणून मागासवर्गीय लोकांची घरे दुरुस्ती करून त्यांना निवारा देणे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे.

**योजना क्रमांक ९ : मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनींना गणवेष खरेदीकरिता पूरक अनुदान देणे.**

कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये शासकीय वसतिगृहामध्ये शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत शासनाच्या सन १९८४ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या गणवेषासाठी दोन ड्रेससाठी फक्त रू. १३५/- देण्यात येतात. त्यामध्ये दोन गणवेष पुरविणे शक्य होत नाही. त्यासाठी जिल्हा परिषद निधीतून कमी पडणारी रक्कम रू. २५०/- पर्यंत अनुदान म्हणून देणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**योजना क्रमांक १० : मागासवर्गीय वस्तीमध्ये ग्रंथालय उघडण्यासाठी अर्थसहाय्य देणे**

कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय वस्तीमध्ये जी समाजमंदिरे आहेत अशा समाज मंदिरामध्ये मागासवर्गीयांच्यासाठी ग्रंथालय सुरू करणे हा या योजनेचा उद्देश आहे. ग्रंथालय सुरू करून त्यामध्ये वर्तमान पत्रे, शासकीय मासिके, दलित साहित्यावर आधारित पुस्तके व इतर चांगली वाचनाची पुस्तके ठेवून त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडावी व त्यांना चांगले साहित्य वाचण्यास मिळावे या उद्देशाने प्रत्येक ग्रंथालयाकरिता रू. १०,०००/- पर्यंत जिल्हा परिषद २० टक्के निधीतून समाजकल्याण विभागामार्फत आर्थिक मदत देण्यात येते.

**योजना क्रमांक ११ : मागासवर्गीय व्यक्तींना आपत्कालीन मदत**

मागासवर्गीय पुरुष-महिलांना नैसर्गिक आपत्ती पूर, वादळ, अतिवृष्टी, जळित इत्यादी मुळे मागासवर्गीय जाती जमातीच्या लोकांच्या स्थितीची व मालमत्तेचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. अशावेळी ते कुटुंब निराधार व पिडीत होतात. अशा लोकांना तात्पुरता आधार मिळावा हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेतून जिल्हा परिषद फंडातून आर्थिक सहाय्य रू. ५,०००/- पर्यंत अनुदान दिले जाईल. महसूल खात्याकडून दिल्या जाणा-या अनुदानास पूरक अनुदान म्हणून दिले जाईल.[२६]

एकंदरीतच जिल्हयातील समाजकल्याण विभाग अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणास्तव सतत प्रयत्नरत आहे. यामधीलच एक भाग म्हणून जिल्हयास सन २००३-०४ या वर्षापासून सामाजिक न्याय तत्त्वावर समाजकल्याण विभागामार्फत नवीन योजना राबविण्यात येवू लागल्या आहेत.

१. जिल्हयातील इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणा-या अनुसूचित जाती जमाती व विमुक्त भटक्या जमातीतील प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली.

२. जिल्हयातील अनुसूचित जाती व विमुक्त भटक्या जमातीतील व्यावसायिक पाठ्यक्रमात शिकणा-या विद्यार्थ्यांना विद्यावेतनाची योजना कार्यन्वित करण्यात येवू लागली आहे.

३. सैनिक शाळेतील विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना जिल्हयात निर्वाह भत्त्याची सोय लागू केली आहे.

४. जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील अनुसूचित जाती जमातीच्या मुलामुलींसाठी निवासी शाळांची सोय केली आहे.

५. मागासवर्गीय मुलांमुलींकरिता असलेल्या शासकीय/अनुदानीत वसतिगृहातील सोयी सुविधांमध्ये वाढ केली जात आहे.

६. जिल्हयातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून अनुसूचित जाती व विमुक्त भटक्या जमातीतील मागेल त्या उमेदवाराला व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे.

७. जिल्हयातील वस्ती/तांडा सुधारण्यावरही भर दिला जात आहे.

८. जिल्हयातील अनुसूचित जाती व नवबौध्दांचे सबळीकरण व स्वाभिमान जागृती केली जात आहे.

अशा या अनेक योजना जिल्हयात नव्याने सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर राजर्षी छ. शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार हा जिल्हयातील इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळविणा-या अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना दिला जावू लागला आहे.[२७]

१. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून राज्यात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास रू. २.५० लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाते.

२. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक बोर्डात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास रू. १ लाख रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाते.

३. राज्याच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास रू. ५० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाते.

४. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून जिल्हयात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास रू. २५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाते.

५. सर्वसाधारण विद्यार्थ्यामधून प्रत्येक तालुक्यात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास रू. १० हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाते.

६. सर्वसाधारण विद्यार्थ्यामधून प्रत्येक माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम येणा-या विद्यार्थ्यास रू. ५ हजार रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र दिले जाते.

७. याशिवाय इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य (७५ टक्के पेक्षा अधिक गुण) मिळवून ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही राजर्षी छ. शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीस पात्र मानले जात आहे व त्यानुसार त्यांना इयत्ता ११ वी साठी दरमहा रू. ३००/- प्रमाणे दहा महिन्याकरिता रू. ३०००/- व इयत्ता १२ वी साठी दरमहा रू. ३००/- प्रमाणे दहा महिन्याकरिता रू. ३०००/- एवढी शिष्यवृत्ती दिली जाते.

सदरच्या शिष्यवृत्त्याद्वारे या समाजातील मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीस प्रोत्साहन दिले जात आहे. तसेच त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्याचा प्रयत्न केला जात आहे तर राजर्षी छ. शाहू महाराजांचा जन्मदिवस २६ जुलै हा दरवर्षी विशेष सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जात आहे.[२८]

एकंदरीतच अनुसूचित जाती व विमुक्त भटक्या जामतीच्या कल्याणास्तव आजतागायत प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नामधीलच एक भाग म्हणून जिल्हयात स्वतंत्र अशी अनेक विकासात्मक महामंडळे ही निर्माण करण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

२. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

३. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

४. संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

५. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

उपरोक्त विकासात्मक महामंडळामार्फत त्यांचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचाविण्याचा प्रयत्न या महामंडळामार्फत केला जात आहे.



१९०८ मध्ये तत्कालिन अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांसाठी उभारलेले मिस क्लार्क होस्टेल



राजर्षी शाहू महाराजांनी उभारलेल्या वसतीगृह मालिकेतील पहिले वसतीगृह
व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग. स्थापना - १९०१

## संदर्भ सूची


१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन : कोल्हापूर जिल्हा, पृ. ३, ४

२. महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा - २००१, २००५, पृ. २८ ते ३०

३. चौधरी, एम. ए., जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९, पृ. ३५, ३६

४. चौधरी, एम. ए., कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९, पृ. ७७

५. भिडे, जी. एल., पाटील, एन. डी., महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, पाचवी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९८, पृ. ११५

६. केशव हरेल, राजर्षी छ. शाहू महाराज यांचे राजकीय विचार, पृ. ३८ ते ४०

७. मुळीक, आर. जी., पंचायती राज्य, प्रथमावृत्ती, मुळीक प्रकाशन, १९९८, पृ. ४३, ४४, ६७ ते ७०

८. कुलकर्णी, एस. के., आर्थिक विकास आणि नियोजन, चौथी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९४, पृ. ३२२

९. चौधरी, एम. ए., जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९, पृ. १२३ ते १३३

१०. चौधरी, एम. ए., कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९, पृ. ४७५, ४७९ ते ४८७

११. देसाई, लिमये, आधुनिक महाराष्ट्र, २००२, पृ. ५१ ते ५४ आणि

भिडे, जी. एल., पाटील, एन. डी., महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा इतिहास, १९९८, पृ. ११३, ११४

१२. चौधरी, एम. ए., कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९, पृ. २०५, २०६, २६८ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - कोल्हापूर जिल्हा, पृ. ७७ ते ८०

१३. पवार, एस. एन., भारतीय समाज व सामाजिक समस्या, पृ. ८७,८८

१४. कोंडेकर, ए. वाय., भारतीय समाज, अकरावी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१, पृ. १०५ ते १०७

१५. चौधरी, एम. ए., कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९, पृ. ४८९

१६. श्रीपतराव शिंदे, भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचे जनक, पृ. ६४ ते ६८

१७. कोंडेकर, ए. वाय., भारतीय समाज, अकरावी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१, पृ. १०५ ते १०७

१८. नलिनी पंडित, जाती व्यवस्था व वर्ग व्यवस्था, १९६४, पृ. ६७ ते ६९

१९. कोंडेकर, ए. वाय., भारतीय समाज, अकरावी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१, पृ. १११, ११२

२०. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा हा महाराष्ट्र, पृ. २१८

२१. चौधरी, एम. ए., कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, १९८९, पृ. ६०१, ६२१, ६२२

२२. समाजकल्याण विभाग, कोल्हापूर जिल्हा : फिटे अंधाराचे जाळे पुस्तिका, पृ. ७ ते १२

२३. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - कोल्हापूर जिल्हा, १९९९-२०००, २००२-०३ पृ. ३३२

२४. जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर जिल्हा - जिल्हा वार्षिक विशेष घटक योजना आराखडा, २००६-०७, पृ. १ ते ८

२५. समाजकल्याण विभाग, कोल्हापूर जिल्हा : फिटे अंधाराचे जाळे पुस्तिका, पृ. १३ ते २७

२६. कोंडेकर, ए. वाय., भारतीय समाज, अकरावी आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१, पृ. १११, ११२

२७. कोल्हापूर जिल्हा समाजकल्याण विभाग, सामाजिक न्याय दर्शन पुस्तिका, पृ. ४

२८. कोल्हापूर जिल्हा समाजकल्याण विभाग, सामाजिक न्यायदर्शन पुस्तिका, पृ.४